स्थापना ॥ श्री गणेशाय नमः ॥ १९८०


# मातोश्री शिवगर्जना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (रजि.)

*॥ मातोश्रीचा विघ्नहर्ता ॥*

**नोंदणी क्रमांक - एफ ००८७०८८ (GBR)**

मातोश्री एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जे. वा. रोड,
परळ-भोईवाडा, मुंबई - ४०० ०१२.

## वर्ष ४७ वे



**वक्रतुंड महाकाय सुर्यकोटि समप्रभः ।**
**निर्विघ्नं कुरुमेदेव सर्वकार्येषु सर्वदा ॥**

## अहवाल सन २०२५

श्री./श्रीमती ____________________

सदनिका क्र. ____________________

# मातोश्री एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
## मातोश्री शिवगर्जना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (रजि.)

**सन २०२६**

***सन्माननीय सभासद बंधू- भगिनींस,***

गेली अनेक वर्षे आपण सर्वजण एकत्र येऊन साजरा करीत असलेला श्री गणेशोत्सव हा आपल्या वसाहतीच्या एकोप्याचे आणि स्नेहाचे प्रतीक बनला आहे. **सन २०२६ सालचा गणेशोत्सव** त्याच जिव्हाळ्याने आणि उत्साहाने साजरा करण्याचे आम्ही ठरविले आहे.

**मातोश्री एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था** आणि **मातोश्री शिवगर्जना सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळ (रजि.)** यांच्या माध्यमातून सन २०२५ चा अहवाल आपणासमोर सादर करताना आम्हास आनंद होत आहे. आपल्या वडीलधाऱ्यांनी सुरू केलेली पवित्र परंपरा अबाधितपणे चालू ठेवीत आहोत.

मंडळ यावर्षी **४७ व्या वर्षात पदार्पण** करीत आहे — ही केवळ मंडळाची नव्हे तर आपल्या संपूर्ण वसाहतीची साधना आहे. श्री गणरायाच्या कृपाशीर्वादाने उपरोक्त मंडळ हे **२०२५ सालापासून सरकारमान्य अधिकृत मंडळ** म्हणून ओळखले जात आहे. वसाहत स्थापनेपासून आजपर्यंत रहिवाशांच्या एकजुटीतून जो **नवसाचा गणपती** बसवला गेला, तीच परंपरा संस्थेच्या माध्यमातून विद्यमान मंडळ पार पाडत आहे.

या उत्सवाची शुद्ध भावना आणि उद्देश हृदयाशी बाळगून मंडळ **सुवर्ण महोत्सवाच्या** दिशेने वाटचाल करीत आहे. या यशस्वी प्रवासात आपणा प्रत्येकाचा हातभार आणि मोलाचे सहकार्य लाभावे, ही नम्र विनंती. सर्वांचे मनःपूर्वक आभार, **धन्यवाद!**

❖ ***आपले स्नेहांकित*** ❖

**मातोश्री एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,**

**श्री. श्रीधर राघो कांबळे**
**-: चेअरमन :-**

**श्री. चंद्रकांत राजाराम दाभोळकर (SEO)**
**-: सचिव :-**

**श्री. श्रीपत सगना केसरकर**
**-: खजिनदार :-**

## मातोश्री एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.

### *मातोश्री शिवगर्जना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (रजि.) - २०२६*

सन्माननीय सदनिकाधारक,

आपल्या वसाहतीच्या स्थापनेपासून म्हणजे **सन १९८० सालापासून** श्री गणेशोत्सवाची भक्तिमय परंपरा अखंडितपणे सुरू आहे. सोसायटीच्या माध्यमातून सुरू झालेली ही पावन परंपरा आज जवळपास पाच दशकांचा प्रवास पूर्ण करण्याच्या मार्गावर आहे. ईमारतीमधील सर्व सदनिकाधारक, हितचिंतक, वर्गणीदार आणि देणगीदार यांच्या निरपेक्ष सहकार्यामुळेच हा उत्सव दरवर्षी अधिक उत्साहाने साजरा होतो आहे. आपल्या प्रेमळ पाठिंब्याशिवाय ही पावन यात्रा शक्य झाली नसती. **सर्वांचे मनःपूर्वक शतशः आभार!** त्याचबरोबर व्यापारी संघटना, फेरीवाले बंधू व र. अ. किडवाई पोलीस ठाणे यांचेही मंडळाच्या वतीने हृदयापासून **आभार, धन्यवाद!**

## ◆ सुचना पत्र ◆

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींस,

उपरोक्त मंडळाची "**वार्षिक सर्वसाधारण सभा**" रविवार **दि. १४-०६-२०२६** रोजी सकाळी १०.३० वा. **मातोश्री ए विंग इमारत, रूम नं. ७०२, सातवा मजला,** जेरबाई वाडिया मार्ग, परळ-भोईवाडा, मुंबई - १२. येथे आयोजित करण्यात आली असुन सदर सभेकरीता वेळेवर उपस्थित राहुन मंडळाच्या कामकाजात सक्रिय भाग घ्यावा, हि विनंती.

## ◆ सभेपुढील विषय ◆

**१)** सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.
**२)** सन २०२५ रोजी झालेल्या गणेशोत्सव मंडळाचा अहवाल सादर करणे.
**३)** २०२६ सालाकरिता कार्यक्रमांची रुपरेषा आखणे.
**४)** कार्यकारी मंडळ नियुक्ती करणे.
**५)** अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

कार्यकारी मंडळाच्या अनुमतीने
**श्री. मनोज श्रीपत केसरकर**
(सचिव)

---

**टिप :**

**१)** गणसंख्ये अभावी सभा तहकुब करावी लागल्यास अर्ध्या तासानंतर सभा त्याच ठिकाणी घेण्यात येईल.
**२)** सभेला येताना सभासदांनी वार्षिक अहवालाची प्रत अवश्य घेऊन येणे.

# मातोश्री शिवगर्जना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (रजि.)

## -: सन २०२५ अहवाल :-

| जमा | रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे |
|---|---|---|---|
| मातोश्री सभासद / रहिवाशी वर्गणी | १,७६,३३६.०० | श्री. गणेश मुर्ती | २४,२००.०० |
| देणगीदार | २,२६,०५५.०० | पावती पुस्तके / अहवाल छपाई | ४,६९३.०० |
| दानपेटी जमा | ३,७९०.०० | बॅनर्स छपाई, दुरुस्ती आणि मजुरी | २२,१००.०० |
| सन २०२४ मधील जमा | १,३१६.०० | विद्युत रोषणाई, मंडप आणि साऊंड | ९५,०००.०० |
| | | श्रींचे आगमन आणि विसर्जन | ६७,२९०.०० |
| | | श्री. सत्यनारायण महापूजा | ११,७५२.०० |
| | | दिवाळी साहित्य वाटप | ७,३७५.०० |
| | | इतर किरकोळ | १५,४६८.०० |
| | | बँक चार्ज | ५३१.०० |
| | | सन २०२६ करीता शिल्लक | १,५९,०८८.०० |
| | | (यापैकी F.D. मध्ये ठेव रु. १,००,०००/-) | |
| **एकुण जमा रुपये** | **४,०७,४९७.००** | **एकुण खर्च** | **४,०७,४९७.००** |

| | |
|---|---|
| **जमा :** | ४,०७,४९७.०० |
| **खर्च :** | २,४८,४०९.०० |
| **शिल्लक :** | १,५९,०८८.०० |

**सर्व वर्गणीदार, देणगीदार, हितचिंतक, आश्रयदाते व**
**मातोश्री व्यापारी संघटना यांचे मंडळाच्या वतीने हार्दिक आभार!**

*आपले स्नेहांकित,*

**मातोश्री शिवगर्जना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (रजि.)**

**कु. विवेक राजाराम चव्हाण**
(अध्यक्ष)

**श्री. मनोज श्रीपत केसरकर**
(सचिव)

**श्री. अमोल चंद्रकांत दाभोळकर**
(खजिनदार)

---

**अहवाल साली ज्या रहिवाश्यांचे दुःखद निधन झाले**
**त्यांना सोसायटीच्या व मातोश्री शिवगर्जना सार्वजनिक**
**गणेशोत्सव मंडळ (रजि.) च्या वतीने *भावपूर्ण श्रद्धांजली !***